REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# अमरावती जिल्ह्यातील शेती विकास स्तराची प्रादेशिक विषमता

डॉ. सचिन एन. भोंबे
भूगोल विभाग प्रमुख , गो. सी. टोम्पे कला, व ाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूर बाजार जि. अमरावती.

**सारांश:**



अमरावती जिल्ह्यातील शेती विकासाच्या माहितीमध्ये शासकीय अनुदान, शासनाकडून नैसर्गिक आपत्त्यांची मदत, जिल्ह्यात शेतीविषयक कृषी महोत्सव, कृषी प्रदर्शनी, नवीन संशोधन केंद्र, हवामान केंद्र, शेतकरी आत्महत्येच्या समस्या आणि जिल्ह्यातील शेती विकासाकरीता उपाययोजना यासर्व गोष्टीचा विचार करण्यात आला आहे. शेतीमधील तंत्रज्ञानाचे आधुनिक योगदान अभ्यासतांना आधुनिक व पारंपारिक साधनांचा विचार केला पण जिल्ह्यातील विकासाच्या अनेक घटकाची माहिती शेतकऱ्यांना विचारली असता; काही तालुक्यातील शेतकरी अनभिज्ञ दिसले जसे मातीचे व पाण्याचे परिक्षण करणे, कृषी महोत्सव, कृषी प्रदर्शनीला भेट देणे, कृषी अधिकाऱ्यांशी सवांद साधणे, नवीन संकरित बियाण्यांची माहिती घेणे तसेच नैसर्गिक आपत्त्याची शासनाचे अधिकारी अतितत्परतेने दखल घेते का? अशा सर्व प्रश्नांची उत्तरे त्यांच्याकडून घेण्यात आली. यावरुन अमरावती जिल्ह्यातील शेती विकास स्तरामध्ये (Development Level) प्रादेशिक विषमता दिसून येते. खालील केलेल्या संशोधनावरुन असे लक्षात येते की, ज्या भागामध्ये सिंचनाची सोय आहे पण शेतकरी इतर बाबतीत अनभिज्ञ आहे. अशा भागात एकच एक पिक घेतांना आढळते तर काही ठिकाणी पाण्याची सोय नसतांना सुध्दा चांगले उत्पादन घेतांना दिसतात. याचाच अर्थ जिल्ह्यामध्ये काही तालुक्यात शेतीचा विकास जास्त तर काही भाग अजुनही मागासलेला आढळतो. सिंचनाची सोय व इतर शेती विकासाच्या आवश्यक गोष्टींची सोय केल्यास अमरावती जिल्ह्यातील शेती विकासाची प्रादेशिक विषमता कमी होऊ शकेल. चिखलदरा व धारणी तालुक्यात असणारी जमीन व हवामान स्ट्रॉबेरी या पिकांकरीता अतिशय चांगली आहे त्यामुळे तेथे शेतीचा विकास होऊ शकते. आजच्या काळामध्ये फक्त एकच एक पिके न घेता वेगवेगळया शासनाच्या अर्थसहाय्याने जर नवनवे शेतीपयोगी उपकम हाती घेतली तर जिल्ह्यातील शेती विकास होऊ शकतो.

## अभ्यासक्षेत्र :

अमरावती जिल्हा महाराष्ट्राच्या उत्तर सिमेवर असून तो भारताच्या मधोमध पसरलेला आहे. अमरावती जिल्हयाचा अधिकतर भाग हा तापी व वर्धा नदीच्या खोऱ्यात विस्तारित झाला आहे. अमरावती जिल्हयांचा अक्षवृत्तीय विवस्तार २०° ३१' उत्तर ते २१° ४६' उत्तर असून रेखावृत्तीय विस्तार ७६° ३७' पूर्व ते ७८° २७'पूर्व रेखावृत्त च्या दरम्यान आढळुन येतो. अमरावती जिल्हयाचे क्षेत्रफळ १२२१.२ चौ. कि. मी. आहे. महाराष्ट्र राज्यांच्या क्षेत्रफळाशी त्यांचे शेकडा प्रमाण ३.९६% आढळते.

## अभ्यासाची उद्दिष्ट्ये :

शेती विकासाचे स्तर काढण्याकरीता **उद्दिष्टे** खालीलप्रमाणे आहे.

१) अमरावती जिल्हयामध्ये २०१५-१६ या वर्षामध्ये जमिनीचा वापर झालेला आहे त्या जमिन उपयोगामध्ये जे वेगवेगळे व्याप्त असलेले क्षेत्र आहे. त्या क्षेत्रामध्ये झालेला बदल यांचा अभ्यास करणे

२) अमरावती जिल्हयामध्ये शेतीच्या विकासात प्रादेशिक बदल व कसा झाला त्यांची कारणे शोधणे. अमरावती जिल्ह्यातील तालुक्याचे पिकांच्या वाढीला जबाबदार असलेल्या घटकांचे, पीक प्रारुपाचे तसेच शेती विकासाचे अध्ययन करणे. ४) शेतीच्या विकासाचे प्रारुप व स्तराचा (Level of Agriculture Development) अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोध निबंधात लागणारी आकडेवारी व माहिती प्राथमिक व दुय्यम स्वरुपाची असून प्रस्तुत संशोधन लेखामध्ये वर्ष (२०१५-१६) आधारे अमरावती जिल्ह्यातील काही तालुक्यांच्या ठिकाणांना प्रत्यक्ष भेटी देऊन माहिती गोळा करण्यात आली, तसेच शोध निबंधातील माहितीचे विश्लेषण पारदर्शक व्हावे म्हणून सांख्यिकीय पध्दतीचा व नकाशाचा वापर केला आहे.

**प्रस्तावना :**

'शेती विकास म्हणजे शेती व्यवस्थेतील उत्पादकता, विकेंद्रीकरण आणि व्यापारीकरणाला त्या विभागातील शेतीतील संबंध व पर्यावरणीय संतुलनात जुळवून घेणारा कालावधी होय.'शेती विकास ही मूळ संकल्पना गुंतागुंतीची असून आंतरसंबधातील काही चलाचा प्रभाव एखाद्या क्षेत्रावरील शेतीच्या उत्पादनशीलतेवर पडतो. परंतु काही चलाचा प्रभाव पडत नाही. तसेच शेती विकास हा विशिष्ट क्षेत्रातील फक्त पीक उत्पादकतेच्या पातळीवर अवलंबून असते. त्यासाठी विशिष्ट अभ्यासात्मक कसोटी निवडून व अनेक घटकांचा आधार घेऊन शेतीच्या विकासाचे प्रारुपांची मांडणी करणे आवश्यक ठरते. (गोपाल किशन, १९८१) शेती विकासाचा अर्थ ज्या उत्पादकतेच्या वाढीशी आहे. ज्यांचा फायदा समाजातील सर्व वर्गांना मिळावा आणि या कारणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास न व्हावा, असे तेव्हाच शक्य होते जेव्हा शेतीचे स्वरुप निर्धारित करण्यासाठी सर्व घटकांचे सूक्ष्म विश्लेषण किंवा अध्ययन केले जाते. या विश्लेषणामुळे शेती विकास कसा होतो याचा उलगडा होतो. या अभ्यासात अमरावती जिल्हयातील शेती विकासाचे स्तर (Level) वैशिष्टयासहीत सिध्द केले व त्याचे काही मुख्य प्रभाव करणाऱ्या घटकांचे विश्लेषण केले आहे.

**विषय विवेचन :-**

**शेती विकासाचे प्रारुप (Pattern of Agricultural Development) :** शेती विकास प्रारुपामध्ये अमरावती जिल्ह्यातील शेतीचा विकास झाला की नाही हे पाहण्याकरिता शेती विकासाचे स्तर काढण्यात आले. निव्वळ सिंचनाखालील क्षेत्र ($X_१$), डिझेल व विद्युत पंपाची संख्या ($X_२$), दुसोटा क्षेत्र ($X_३$), ट्रॅक्टरची संख्या ($X_४$), नांगर संख्या ($X_५$), संकरित कापसाचे क्षेत्र ($X_६$), रासायनिक खतांचा टनामध्ये वापर ($X_७$) या सर्व घटकांचे एकूण पिकाखालील क्षेत्राशी टक्केवारी तसेच ग्रामीण साक्षरतेचे शेकडा प्रमाण ($X_८$) असे एकूण ८ सूचनायंत्रक (Indicators) या सर्वांची बेरीज करुन माध्य व प्रमाण विचलन काढून सिद्यीकी (१९८७) या शास्त्रज्ञांच्या सुत्राने संयुक्त निर्देशांक काढण्यात आला, त्यावरुन अमरावती जिल्ह्यातील १४ तालुक्याची विकास स्तर (Development Level) काढण्यात आले, तक्ता कं.(१)

**तक्ता क्रं.१ अमरावती जिल्ह्यातील शेती विकासाचे संयुक्त निर्देशांक**

| जिल्हे | $X_1$ | $X_2$ | $X_3$ | $X_4$ | $X_5$ | $X_6$ | $X_7$ | $X_8$ | C.I. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| धारणी | ८.०४ | ४.०२ | ०.३९ | ०.६१ | १०.१६ | ११.५२ | १८.६३ | ७४.७५ | **४८.४६** |
| चिखलदरा | १.४१ | ०.७४ | ०.१४ | ०.५१ | ४.९२ | २.५४ | ११.७३ | ७५.३३ | **४६.६२** |
| अंजनगाव | २५.४३ | ३.३४ | १२.०४ | ०.३७ | ४.७५ | २३.०५ | २५.१४ | ८८.४१ | **५८.६५** |
| अचलपूर | २५.०७ | ६.६१ | ११.३१ | ०.४५ | १०.१९ | २६.२७ | २६.१५ | ८७.३२ | **५९.०४** |
| चांदूरबाजार | १९.१५ | ३.७५ | ८.०९ | ०.३६ | ६.४३ | २९.०५ | २२.३६ | ८७.५० | **५८.१५** |
| मोर्शी | ३८.७० | ५०.५३ | ९.७३ | १.७१ | ८.७४ | ३२.६७ | ३०.५८ | ८७.०९ | **६०.९९** |
| वरुड | १४.०२ | ७.८२ | ८.४ | ०.१५ | ९.८९ | १६.८८ | ३४.८२ | ८३.७७ | **५६.६०** |
| तिवसा | ११.६७ | ५.४२ | ५.९५ | ०.५२ | ६.२० | २१.६९ | २९.१७ | ८७.२० | **५७.७९** |
| अमरावती | १४.६९ | १.५५ | ७.९१ | ०.२९ | ४.१८ | १४.५५ | २७.११ | ८७.१० | **५६.९९** |
| भातकुली | ९.६३ | ०.४४ | १४.६१ | ०.४१ | ६.४४ | ८.०५ | १६.४८ | ८८.३५ | **५६.०७** |
| दर्यापूर | ४.७१ | ०.०४ | ७.०७ | ०.६२ | ३.८१ | २१.७४ | २०.८६ | ८७.८८ | **५६.७५** |
| नांदगाव ख. | १.६२ | २.८९ | ०.५८ | ०.२१ | ६.४४ | २४.५८ | १५.०९ | ८५.८२ | **५४.९१** |
| चांदूररेल्वे | १२.१२ | ३.१५ | १.३६ | ०.११ | ६.२९ | १३.४६ | १९.९२ | ८५.६५ | **५५.०६** |
| धामणगाव रेल्वे | १७.९१ | ४.०८ | १०.६२ | ०.२३ | १२.१५ | २९.९५ | २०.१२ | ८५.४६ | **५७.३१** |
| जिल्हा | १४.९५ | ६.९० | ७.५४ | ०.३७ | ७.२१ | २०.७८ | २३.१५ | ८५.०७ | **५६.१३** |
| S.D. | ९.८६ | १२.३३ | ४.५६ | ०.३७ | २.४९ | ८.५२ | ६.२० | ४.२८ | |
| Mean | १४.६ | ६.७५ | ७.०४ | ०.४६ | ७.१८ | १९.७८ | २२.७५ | ८५.११ | |

**संदर्भ :-** क्षेत्रीय कार्य वर्ष (२०१५-१६)

वरील सर्व निर्देशांकावरुन शेती विकासाचे उच्च, मध्यम व निम्न स्तर खालीलप्रमाणे काढण्यात आले .

**तक्ता क्रं. (२) अमरावती जिल्ह्यातील शेती विकासाचे स्तर**

| Levels of Development | Composite Index value | No. of Tahsil | Name of Tahsil |
|---|---|---|---|
| High | Above ५७ | ०६ | अंजनगाव, अचलपूर, चांदूरबाजार, मोर्शी, तिवसा, धामणगाव रेल्वे |
| Medium | ५० to ५७ | ०६ | वरुड, अमरावती, भातकुली, दर्यापूर, नांदगाव ख., चांदूररेल्वे |
| Low | Below ५० | ०२ | धारणी, चिखलदरा |

**संदर्भ :-** क्षेत्रीय कार्य वर्ष (२०१५-१६)

LBP PUBLICATION




१) **शेती विकासाचे उच्च स्तर (High Level Development):** अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव, अचलपूर, चांदूरबाजार, तिवसा व धामणगाव रेल्वे तालुक्यांचा संयुक्त निर्देशांक ५७ च्यावर म्हणजे विकास स्तर उच्च आहे. मोर्शी तालुक्यात निव्वळ सिंचनाखालील क्षेत्र, दूबार क्षेत्र, संकरित बियाणाचे क्षेत्राचे प्रमाण जास्त असून रासायनिक खतांचा वापर, नांगर, ट्रॅक्टर, डिझेल व विद्युत पंपाची संख्या जास्त असल्यामुळे या तालुक्यात सर्वात जास्त शेती विकास झालेला आहे. त्याचबरोबर वरील सर्व घटकाचे प्रमाण जास्त असल्यामुळे अंजनगाव, अचलपूर, चांदूरबाजार, तिवसा व धामणगाव रेल्वे तालुक्यांचा विकास स्तर उच्च आहे, तक्ता क्ं.(२)

२) **शेती विकासाचे मध्यम स्तर (Medium Level Development):** वरुड, अमरावती, भातकुली, दर्यापूर, नांदगाव खंडेश्वर, चांदूररेल्वे तालुक्यात विकास स्तर मध्यम स्वरुपाचा आहे, वरुड, अमरावती, भातकुली, दर्यापूर, नांदगाव खंडेश्वर, चांदूररेल्वे तालुक्यात संयुक्त निर्देशांक ५४ ते ५७ च्या दरम्यान असल्यामुळे विकास स्तर मध्यम स्वरुपाचा आहे, तक्ता क्ं.(२)

३) **शेती विकासाचे निम्न स्तर (Low Level Development):** धारणी व चिखलदरा तालुक्यात विकास स्तर निम्न दिसून येते, धारणी व चिखलदरा या दोन तालुक्यात संयुक्त निर्देशांक अनुक्रमे ४८ व ४६ एवढे कमी असल्यामुळे विकास हा निम्न झाला आहे. या तालुक्यात निव्वळ सिंचनाखालील क्षेत्र, दूबार क्षेत्र, संकरित बियाणाचे क्षेत्राचे प्रमाण कमी असल्यामुळे विकास स्तर कमी दिसून येतो, तक्ता क्ं.(२)

## निष्कर्ष (Conclusion) :

१) मोर्शी, अंजनगाव, अचलपूर, चांदूरबाजार, तिवसा व धामणगाव रेल्वे तालुक्यांचा शेतीचा विकास उच्च आहे कारण आधुनिक तंत्रज्ञानाबरोबर इतर घटकही कारणीभूत आहे.

२) वरुड, अमरावती, भातकुली, दर्यापूर, नांदगाव खंडेश्वर, चांदूररेल्वे तालुक्यात वसाहतीयोग्य जमीन जास्त, सिंचनाचा वापर कमी तसेच डोंगराळ व जंगलव्याप्त क्षेत्र यामुळे शेतीच्या विकासाचा स्तर मध्यम स्वरुपाचा दिसून येतो.

३) धारणी व चिखलदरा तालुक्यात शेती विकास निम्न आहे. कारण धारणी व चिखलदरा तालुक्यात मृदा सुपिकता कमी, डोंगराळ, पर्वतीय व जंगलयुक्त दुर्गम भागामुळे येथील शेतीचा विकास स्तर निम्न स्वरुपाचा दिसून येतो.

४) अमरावती जिल्ह्यामध्ये तृणधान्य व कडधान्यापेक्षा कापूस व सोयाबीन या पिकांच्या वाढीचा दर जास्त दिसून येतो. कारण नगदी पिकांकडे शेतकऱ्याचे कल जास्त असल्यामुळे व तृणधान्याच्या उत्पादनात कमतरता आढळून येत असल्यामुळे शेतकरी कापूस व सोयाबीन ही नगदी पीके घेताना आढळतो.

५) पिकांचे प्रारुप हे प्रामुख्याने हवामान या घटकावर अवलंबून असून मागील ३ दशकामध्ये अमरावती जिल्ह्यामध्ये पीक प्रारुप बदलले आहे. बाजरी व मक्याच्या क्षेत्राचे प्रमाण कमी झाले असून कापसाचे प्रमाणही कमी होत आहे त्याऐवजी सोयाबीनचे प्रमाण वाढलेले आहे. कारण जमिनीची कार्यक्षमता कमी झाली आहे, पर्जन्याची अनिश्चितता तसेच सोयाबीन हे कमी पर्जन्यमानात येणारे पीक असून कमी कालावधीत व कमी खर्चात येणारे पीक आहे.

६) अमरावती जिल्हयामध्ये काळी, खरडी, बरडी, मुरमाडी आणि गाळाची जमिन आढळते. खरडी व बरडी जमिन अमरावती, भातकुली, नांदगाव खंडेश्वर, चांदूररेल्वे, धामणगावरेल्वे तिवसा, चिखलदरा व धारणी तालुक्यात तर चांदूरबाजार, मोर्शी, वरुड, अचलपूर, दर्यापूर व अजंनगाव तालुक्यात गाळाची जमिन आढळते. त्यामुळे या तालुक्यात उच्च विकास स्तर आढळते.

## संदर्भ सूची :-

१) **Joshi V. G. (1980) :** 'Agicultural Development Around A City, A Case Study of Indore Tahsil M.P.' The Deccan Geographer, vol 21 No. 3 Pp. 48

२) **Mohanty B. B. (2009):** Regional Disparity in Agricultural Development of Maharashtra, Economic & Political Weekly, february 7, 2009

३) **Patil B.D. (2013) :** Regional Disparities in Levels of Agricultural Development in Dhule and Nandurbar Districts, India *Research Journal of Agriculture and Forestry Sciences* Vol. 1(5), 9-12, June (2013)

४) **Singh J.P. (1984):** "Level of Agricultural Development in M.P." The Deccan Geographer. Vol.33, No. 1 Pp.32

५) **Agriculture Development Index, Approach paper (1999):** NABARD,Central Statistical Information Department. Mumbai

LBP PUBLICATION